VOL- VI ISSUE-XII DECEMBER 2019 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 5.707 ISSN 2349-638x

# व्यसायायिक नितीमत्ता व नैतिक मूल्यांचे अध्ययन

डॉ. नीता धर्माधिकारी

**सारांश:-**

*निती, नीतिशास्त्र म्हणजे व्यक्तीच्या योग्य वागणुकीचा तत्वांचा अथवा मुल्यांचा संच होय़नितीमुल्य म्हणजे नैतिक कर्तव्याच्या दृष्टीकोनातून चांगले काय व वाईट काय् यांच्याशी निगडीत असलेली शाखा होय. नितीमुल्ये हा शब्द ग्रीक शब्दातून आला आहे व्यक्तीच्या कार्याशी संबंधित काय बरोबर, काय चूक, चांगले काय, वाईट काय, कोणते कायदेशीर कोणते बेकायदेशीर या सर्व संकल्पनाशी नितीमुल्ये जोडलेली असतात.*

*कोणताही व्यवसाय हा नफा कमविण्याकरिता केला जातो. प्रत्येक एक व्यवसायात एक नितीमत्ता चौकट असते. व्यवसायिकांना व्यवसायिक नितीमत्ता व नैतिक मुल्यांचा स्वीकार करणे आवश्यक आहे व्यवसायिक नितीमत्तेची महत्व कसे आहे, ह्याचे अध्ययन करण्यासाठी हा पेपर लिहण्यात आला आहे.*

***मूळशब्द***-*व्यवसाय, नितीमत्ता, नैतिक मूल्य, बेकादेशीर.*

**प्रस्तावना:-**

Ethics हा शब्द “Ethicos” या ग्रीक शब्दातून व ethicus या लॅटिन शब्दातून आला आहे. म्हणजे कोणत्याही व्यवसाय संस्थेतील विविध पातळीवर कार्य कारणाऱ्या आणि कामगारांवर त्या संस्थेचे यश अवलंबून असते Ethics ही सामाजिक शास्त्राची एक शाखा आहे. ते सामाजिक मूल्य नौतिक मुद्याशी संबंधित आहे नैतिकता ही व्यक्तिगत, व्यवसायिक, प्रबंधकीय मूल्य ह्याचे स्वरूप आहे

Ethics are moral principles and values that govern action and decision of an individual or group – Eric Berkowitz and others. व्यक्ती किवा समूह यांच्या कृती आणि निर्णय यावर नियंत्रण ठेवणारी नितीमुल्ये किंवा नैतिक तत्वे म्हणजे निती तत्वे होय- एरिक बर्कैविझ आणि इतर यांचे मते. व्यवसायिक नैतिकतेचे धर्म, संस्कृती व कायदा असे महत्वपूर्ण घटक आहेत.

नितीमुल्ये किंवा तत्वे व्यक्तींना काय बरोबर आहे काय चुकीचे आहे याबाबत मार्गदर्शन करतात. नितीचा संबंध चांगले आणि वाईट याच्याशी आहे व या करिता ते मार्गदर्शन करतात. बरोबर आणि चुकीच्या वागणुकीच्या तत्वाचा संच म्हणजे नैतिकता (Morality) होय. नैतिकता काळानुसार बदलणारी आहे. त्याचा संबंध मानवाच्या वर्तणुकीशी येते मॅन्यूयल व्हिलस्विझ:- नैतिकता हि अशी शिस्त आहे कि, जो व्यक्ती अथवा समाजाच्या नैतिक दर्जाचे परीक्षण करते. त्यानुसार हा दर्जा आपल्या जीवनात कसा वापरण्यात येतो आणि तो योग्य आहे की अयोग्य आहे हे पाहिले जाते. अर्थात त्याचा वापर करणे चांगले कि वाईट आहे, हे बघितले जाते. प्रत्येक व्यापार व्यवसाय संस्थेच्या उद्धीष्टाची पूर्त्ता करण्यासाठी उपक्रमातील भौतिक घटकांबरोबरच मानवीय घटक देखील महत्वपूर्ण आहेत. अधिकार संपादन करणे हा प्रत्येक मनुष्याचा अंगभूतगुण आहे. प्रत्येक व्यक्तीने अधिकारी व कर्मचारी म्हणून केलेले व्यवहार हिताने प्रभावीत झालेले असतात. व्यवसाय सत्तेचा उपयोग करून व्यक्तिगत स्वार्थ साधण्याचा प्रयत्न केला जातो. प्रत्येक संस्थेमध्ये कर्मचाऱ्याची भूमिका नैतिक दृष्टीने विश्वस्ताची असते. स्वार्थाच्या लालसेपाई कर्मचारी व्यवहार करतील तर संस्थेची अधोगती होते. जेव्हा व्यक्ती समुहासाठी चांगले कृत्य करेल, सहकार्य करेल तर ती सकारात्मक भावना होईल. याउलट नकारात्मक उपयोग म्हणजे स्वत:चा फायदा करण्यासाठी दुसऱ्यांचा उपयोग करून घेणे, हे अनैतिक कृत्य आहे.

**अध्ययनाचे उद्देश:-**

१. व्यवसायातील नितीमत्ता व नैतिक मुल्यांची संकल्पना समजवून घेणे.
२. नीतीमत्तेचे व्यवसायातील आवश्यकता व योगदानाचे अध्ययन करणे.

**अध्ययन पद्धती:-**

हा पेपर पूर्णत: दुय्यम स्त्रोतावर आधारित आहे पुस्तके, मासिक, वर्तमानपत्राच्या माहितीवर आधारित आहे.

Business ethics refer to right or wrong behavior in business decisions ज्या प्रमाणे व्यक्तीच्या प्रगतीकरिता व्यक्तिगत चारित्र्याची गरज असते त्याचप्रमाणे राष्ट्राच्या प्रगतीसाठी चारित्र्याची गरज असते.

**वैशिष्ट्ये :-**

**१. मूल्य आणि ज्ञान:-**

मूल्य म्हणजे "मूल्य आणि ज्ञान" यांची बेरीज होय. व्यवसायात या दोन्ही गोष्टीची गरज आहे.

**२. संबंध-**

योग्य गोष्टीचा स्वीकार करण्याची नितीमुल्याशी संबंध आहे चांगली काय वाईट काय हे प्रथम योग्य गोष्टीचा स्वीकार केल्या जातो.

**३. व्यवसायाचे यश टिकविणे:-**

व्यवसायाच्या अस्तित्वासाठी नितीमुल्यांची कास धरावी लागते. व्यवसायिक नितीमुल्यांना संघटनेची मान्यता मिळाली असते. व्यवसायाशी असलेली प्रामाणिकपणा त्याद्वारे दिसून येते. व्यवसायात बाजारपेठेत एकाधिकाराची स्तिथी निर्माण होते.परंतु, नीतीमूल्यांद्वारे या अवस्थेवर नियंत्रण प्राप्त करता येते. व्यवसाय मग तो कोणत्याही प्रकारचा राहो, त्यात नितीमत्ता नियमांचे पालन करणे गरजेचे आहे ग्राहक हा विपाणीचा राजा आहे, असे असूनही त्यांची फसवणूक होण्याची भीती नेहमीच असते.

**४. आवश्यकता:-**

नितीमुल्ये ही व्यापक कल्पना आहे. नीतिमूल्यांचा संबंध सदाचाराशी असतो प्रत्येक व्यवसायिक व उत्पादक हे नितीमुल्य जपण्याचा प्रयत्न करतात. उत्पादन जे विभिन्न घटक भाग घेतात, त्यांना योग्य मोबदला मिळणे गरजेचे आहे. ग्राहकांच्या हिताचे रक्षण होणे गरजेचे आहे त्यांना उच्च प्रतीच्या वस्तू कमी किंमतीत मिळणे गरजेचे आहे कामगारांना त्याचे वेतन, भांडवलदारांना त्यांचा रक्कमेवर योग्य व्याज मिळणे गरजेचे आहे. व्यवसायात भाग घेणाऱ्या प्रत्येक घटकांना योग्य प्रतिष्ठा व काम मिळाले पाहिजे प्रत्येकाला समान संधी मिळणे गरजेचे आहे . व्यवसायाकरिता नियमांचे योग्य पाळन करणे गरजेचे आहे. निती म्हणजे काय योग्य व काय अयोग्य आहे, ती प्रामाणिकपणावर आधारित हवीत. व्यवसायिकांनी प्रथम ग्राहकांची सेवा करावी व नंतर नफा कमवावा नफा किती असावा याचाही एक मर्यादा असावी. त्याकरिता कुणाचेही शोषण करू नये. प्रत्येक घटकाचा जो उद्देश आहे, तो पूर्ण होणे गरजेचे आहे, कर्मचाऱ्यांना आलेल्या तक्रारी स्विकारून त्याचा निपटारा करावा. भ्रष्टाचार, लालफीतशाही, काळाबाजार असे कोणतेही कृत्य करू नये. व्यवसायिकाने आपल्या सामाजिक जबाबदारीचे भान ठेवावे. समाजाप्रती एकनिष्ठ राहावे. व्यवसायाद्वारे मानवी प्रतिष्ठा वाढविणे गरजेचे असते.

**नितीमूल्याची आवश्यकता:-**

**१. सामाजिक दायित्व:-**

व्यवसाय हा नफा कमविण्याचा उद्देशाने केला जातो. नफा कमावतांना समाजाचा कोणताही विचार केला जात नाही. आपल्या व्यवसायाची काही प्रमाणात सामजिक जबाबदारी आहे. ही भावना व्यवसायिकांमध्ये वाढविणे गरजेचे असते. ते नितीमुल्यांद्वारे सहज शक्य होते

**२. माफक किंमत:-**

प्रत्येक ग्राहकाला वस्तूची किंमत कमी देऊन दर्जेदार वस्तू हवी असते. परंतु काही व्यवसायिक या गोष्टीकडे दुर्लक्ष करतात व जास्त किंमत आकारून ग्राहकांचे शोषण करतात. त्यामुळे ग्राहकांचा आत्मविश्वास वाढतो उळमळतो. व्यवसायिक नीतिमत्तेद्वारा या गोष्टीला आला बसेल व त्यांना कमी किंमतीत वस्तू व सेवा पारपत होतील.

**३. अयोग्य प्रथांपासून संरक्षण-**

व्यवसायाशी संबंधित कामगार, प्रतिस्पर्धी, गुंतवणूकदार, ई. चे अयोग्य प्रथांपासून संरक्षण करण्याची जबाबदारीची भावना व्यवसायिकांमध्ये गरजेचे आहे व आवश्यक आहे त्याकरिता नितीमुल्याची गरज आहे. कारण कोनत्या प्रथा सकारत्मक आहे हे समजले.

**४. व्यवसायिक प्रतिष्ठा:-**

प्रत्येक व्यवसायिक आपल्या व्यवसायाचा नावलौकिक वाढवा म्हणून विशेष प्रयत्न करीत असतो. एकदा प्रतिष्ठेला तडा गेला तर स्पर्धेत टिकणे कठीण होते. नावलौकिक व प्रतिष्ठा जपण्याकरिता नितीमुल्यांची गरज भासते

**५. समाज व व्यवसायिकांचे संबंध-**

व्यवसायिक हे फक्त नफ्याच्या उद्देशाने काम करत असतील तर त्यांना सामाजिक जबाबदारीचे भान राहणार नाही. त्यामुळे समाजाची उपेक्षा होते व समाजाच्या रोषही व्यवसायिकांना पत्करावा लागतो. पण व्यवसायिक नितीमुल्यांचे पालन केल्यास जबाबदारीची भावना व्यवसायिकांमध्ये निर्माण होईल व समाज व व्यवसाय यांच्यातील संबंध मधूर होतील जनतेच्या मनात व्यवसायाबद्दल आदर युक्त भावना निर्माण होईल.

**६. ग्राहकांचे हित संरक्षण-**

व्यवसायिक नितीमुल्यांने व्यवसायाद्वारा ग्राहकांचे शोषण होत नाही. त्यांना दर्जेदार वस्तू व कामू किंमतीत मिळतात. ग्राहकांची कोणत्याही प्रकारची फसवणूक होत नाही. कारण त्याठिकाणी नितीमुल्यांचे पालन करण्यात येते ग्राहकांचे हिताचे रक्षण करणे हे उत्पादकाचे कार्य आहे

**७. निर्णय घेणे:-**

व्यवसायात नैतिक योग्य निर्णय घेण्यास एक मार्गदर्शिका तयार करण्यात येते. कारण वेगवेगळे प्रसंग येतात. निर्णय घेताना नितीमत्ता चौकटीद्वारा योग्य निर्णय काय आहे ठरविता येते.

**नितीमूल्यांचे महत्व-**

कोणत्याही व्यवसायिक संघटनेत नितीमूल्य तयार केले जातात व त्याचे पालनही केल्या जाते, पुरातन काळापासून मूल्यांचे महत्व अनन्य साधारण आहे परंतु बदलत्या परिस्थितीमुळे व्यवसायाचे स्वरूपही बदलेले आहे नफा कमवण्याचे प्रमाण वाढला आहे, स्पर्धा वाढल्याने मूल्यांना विशेष महत्व प्राप्त झालेले आहे. स्पर्धेत अस्तित्व टिकविण्याकरिता ___मार्गदर्शक ठरते.

**१. समस्या निपटारा:-**

कोणताही व्यवसाय स्थापनेपूर्वी काही तत्वे निर्धारित करण्यात येतात व त्याचे पालनही आटोकाट करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे त्या वेळी कोणत्याही समस्या निर्माण होणार नाही. व झाल्यास तर त्याचे ताबडतोब निराकरण करता येईल. आपआपसातील त्यामुळे संबंध चांगले बनतात

**२. आदरची भावना:-**

व्यवसायाने आपले सामाजिक उत्तरदायित्वाचे भान ठेवले तर समाज व व्यवसाय यांच्यातील दरी कमी कमी होईल व समाजमनात व्यवसायाबद्दल आदराची भावना निर्माण होईल. समाजमनात चांगली प्रतिमा निर्माण होते. ग्राहकांचे समाधानही होते.

**३. उत्पादनात वाढ:-**

व्यवसायाबद्दल समाज मनात विश्वासाची भावना निर्माण झाली की ग्राहकवर्गाची संख्या वाढते. मागणीतही वाढ होते. मागणी वाढल्याने उत्पादनातही वाढ होते. याठिकाणी संघटनेचे एकी दिसून येते कर्मचारी, भागधारक याचा हितांचे संरक्षण होते. संस्थेप्रती सर्वांचा विश्वास बसतो व ते आपले कार्य चोखपणे बजावतात.

**४. विक्रीत वाढ:-**

मागणीनुसार दर्जेदार वस्तूंचीउत्पादन करून मागणी पूर्ण करण्याचा प्रयत्न केल्यास वस्तूच्या विक्रीतही विक्रमी वाढ होईल व नफा ही वाढेल.

**५. आरोग्यदायी वातावरण व स्पर्धा:-**

नितीमुल्यांमुळे ग्राहकांचे व्यवसायाबद्दल उत्पादक, व्यापारी, कामगार, मालक यांच्यामध्ये संबंध वाढतातकारण प्रत्येक घटक एकमेकांशी, प्रामाणिकपणा व विश्वासाने करावा त्यामुळे आरोग्य वातावरण निर्माण होईल. संघर्ष, असंतोष, द्वेष ह्या भावनांचा लोप होईल. या कार्यक्रमाद्वारे कर्मचाऱ्यांना चांगले काय वाईट काय हे येते कळते. त्यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होतो. आत्मविश्वासाची भावना कर्मचाऱ्यांमध्ये वाद् जीला लागेने हे चांगले लक्षण आहे

**६ व्यवसायाचा विस्तार:-**

आरोग्यदायी, योग्य वातावरण निर्मितीमुळे एकमेकांबद्दल कर्मचाऱ्यांच सौहार्दपूर्ण संबंध निर्माण होतात प्रतिस्पर्धी व्यापारी संख्या कमी होते. प्रगतीच्या मार्गात हा असलेला अडसर दूर झाल्याने व्यवसायाचा सहज व सुलभतेने विस्तार करता येतो. व व्यवसायाचे अस्तित्व कायम होते.

**७. अनुचित व्यवहार आळा:-**

काळाबाजार, कृत्रिम उच्च किंमत, वजनात बनवाबनवी, अनुचित व्यापार, वजनात घोटाळा,डूप्लीकेट विक्री, धोकादायक उत्पादन, ई. वर आळा बसेल. कारण व्यवसायिक नितीमत्ता व नैतिक मुल्यांद्वारे या गोष्टीवर नियंत्रण राहील.

**८. श्रमिकांना महत्व:-**

श्रमिकांचे भूमिका महत्वपूर्ण असेल त्याचे शोषण होत नाही. व्यवसायिक नितीमुल्याचे पालन करणाऱ्या संस्थेचे स्थान निर्माण होते. संस्थेच्या प्रामाणिकपणामुळे ग्राहकांचा विश्वास संस्थेवर बसतो व वस्तुंची खरेदी या संस्थेतूनच करतात स्थायी ग्राहक मिळाल्याने व्यवसायाचा विस्तार होतो. त्यांच्या गरजा पूर्ण झाल्याने आत्मविश्वास वाढेल. ग्राहकांच्या हिताचे संरक्षण होते.

नितीमूल्यांचे पालन करतांना काहीअडचणी येतात. पण नाण्याच्या जश्या दोन बाजू असतात, तसे प्रत्येक गोष्टीला महत्व मिळण्यासाठी कांही समस्यांचा सामनाही करावा लागतो.

**निष्कर्ष:-**

व्यवसायातील नितीमूल्यांमुळे एक कार्यक्षम अर्थव्यवस्था निर्माण होते. कोणतेही तयार केलेले नियम व

कायदे यांचे तंतोतन पालन केल्याने संस्थेचा विकास होतो. एक चौकट व्यवसायाला मिळाल्याने सरकारचा हस्तक्षेप कमी होतो. समाज विरोधी कृत्यात भाग घेत नाही. ग्राहकांच्या समस्याही सोडविल्या जातात. काही राष्ट्रात नितीमुल्यावर आधारित अभ्याक्रम राबविल्या जातात. देशाच्या विकासही नितीमुल्याने झाला आहे. विचारविनिमय करून बरेचशे प्रश्न सोडवल्या जातात. समाजातील अराजकता दूर होऊन शांतता व सुव्यवस्था निर्माण होते. पण हे सर्व केव्हा संभव होईल जेव्हा व्यवसायिक नितीमुल्यांचे पालन केल्या जाईल त्यामुळे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक विकास होईल. ग्राहक संरक्षण विविध कायदे करण्यात आल्यानंतरही ग्राहकांची फसवणूक होते. व्यवसायीकांमध्ये नितीमूल्यांमुळे जबाबदारीची भावना निर्माण होईल. ग्राहकांचे हित जोपासल्या जाईल. प्रत्येक व्यवसायाला प्रतिष्ठा प्राप्त करण्यासाठी धडपड करावा लागते व ती जपावी लागते अनेक प्रथा नितीमुल्यांद्वारा बंद होतील.

**निष्कर्ष:-**

मुल्ये ही प्रत्येक मानसिकतेची प्रतीके समजली जातात. कोणतीही व्यक्ती काही अपेक्षा बागळून असतात. काहींचे विचार सकारत्मक तर काहींचे नकारात्मक विचार असतात. तश्याच प्रतिक्रियाही भिन्न असतात. कुटुंबात होणाऱ्या संस्कारावर मुल्ये ही आधारलेली असतात. संघटनेत कार्य करणारे कामगार व कर्मचारी हे ही वेगवेगळ्या मूल्यांचे जतन करणारे असतात. परंतु संघटनेची नौतिक मुल्यांची एक चौकट आहे. उपक्रमात कर्मचाऱ्यांचे मनोबळ वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. संघटनेवर ही त्याच्या अनुकूल प्रभाव दिसून येतो.

**संदर्भ:-**

१. संघटनात्मक वर्तवणूक– डॉ. बोधनकर, डॉ. कानेटकर.
२. कौशल्य विकास – डॉ. देहलीवाल
३. Skill Development – Dr. Tushar Chaudhary
४. Skill Development – Dr. Akash Agrawal
५. Business Ethics & Corporate Governance – K. Nirmala-B.A, Karunakara Reddy, N.Aruna Rani .
६. Business Ethics & Corporate Governance – Dr. S.S. Khanna